# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०२/२०१८

**१) गळफास लावुन इसम आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १०/०२/२०१८ चे ११.२० ते ११.२५ वाजता दरम्यान यातील आरोपी न्याधीन बंदी क्र. १५८ ने अप क्र. २६३/१७ कलम ३०२,१४३,१४७,१४१ सहकलम ३(२)(५)३,(२)(व्हीए) अॅट्रॉसिटी अॅक्ट सहकलम १३५ मपोका. मध्ये जिल्हा कारागृह वर्ग—१ भंडारा या कारागृहात नमुद आरोपी हा दि. १०/०२/२०१८ ला रात्री ११.२० ते ११.२५ वाजत टावेलनी खिडकीच्या गजाला गळफास लावुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी भंडारा जिल्हा कारागृह वर्ग—१ अधीक्षक अ.म. कुमरे तर्फे पोशी. सचिन यादोरव बोरकर भंडारा जिल्हा कारागृह वर्ग—१ यांचे लेखी तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) भांडण करून लाकडी काठीने कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिंनाक ११/२/२०१८ चे १५.०० वाजता यातील फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा आकाश वय २२ वर्ष याचेसह नवीन घराचे स्लॅप वरील पाणी बाहेर काढत असता, यातील आरोपीने तुझ्या घराचे भिंतीवर पडतो असे बोलुन भांडण केले व फिर्यादीचा मुलगा आकाश यास लाकडी काठीने कपाळावर मारून जखमी केल्याने, फिर्यादी हरी बाला वैद्य वय ५५ वर्ष रा. सोनुली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा.खोकले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणा वरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ११/०२/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व हनुमान देवस्थान ट्रस्टचे लोक आरोपीचे पानठेल्याचे अतीक्रमण हटवीत असता आरोपी याने 'तुम्ही माझा पानठेला का हटविला' असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून ट्रस्टचे लोकांना पुढे पाहुन घेण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सफौ. उईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) निष्काळजीपणे ट्रॅक्टर चालवुन पाय फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ३१/०१/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन जखमी हमाल फिर्यादी हा ट्रॅक्टरवर बसण्यासाठी गेला असता, त्याचा पाय ट्रक्टरचे पल्ल्या वरून घसरून पायाला मार लागला, त्याचा उपचार सावजी हॉस्पीटल ब्रम्हपुरी येथे केला असता, कम्पाऊंड फॅक्चर अॅकल जाईन्ड असा अभिप्राय दिल्याने, फिर्यादी जखमी कम्लेश राजकुमार पोगडे वय ३५ वर्ष रा. मांढळ यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३८ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोना. बागळे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**५) ट्रेलरच्या धडकेत दोन गंभिर जखमी :—**

दिनांक ११/०१/२०१८ चे ११.२५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा मित्र गणेश सपाटे याचे सोबत त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर ७४१० ने एनएच ०६ रोड क्रॉस करीत असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन जफिर्यादीचे मोटार सायकलला धडक देवुन फिर्यादी व मोटार सायकल चालक हा गंभिर जखमी झाल्याने, फिर्यादी शामराव जयसिंग मडावी वय ४५ वर्ष रा. कोडेलोहारा(वडेगाव)जि. गोंदीया यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवी. सहकलम १८४,१३४,/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक १०/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन वरठी येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू किंमती ९००/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १०/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनाकरीता ०५ ईतर वाहनांवरती — ८३ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.